श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
☎ :022-62491111 / 62491112

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www. siddhivinayak.org
email :admin@siddhivinayak.org
info@siddhivinayak.org

दिनांक : २१/०८ /२०२५

## दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

विषय : भाद्रपद गणेशोत्सव २०२५ कालावधीत गणेश विसर्जनाकरीता न्यासामार्फत विविध मंडळांतर्फे ठेवण्यात येणाऱ्या जलजीवरक्षकांना टी–शर्ट खरेदी करून देण्याकरीता सिलबंद दरपत्रके मागविण्याबाबत.

भाद्रपद गणेशोत्सव २०२५ या उत्सवाकरीता भाद्रपद गणेशोत्सव कालावधीत गणेश विसर्जनाकरीता न्यासामार्फत विविध मंडळांतर्फे ठेवण्यात येणाऱ्या जलजीवरक्षकांना टी–शर्ट खरेदी करून देण्याकरीता सिलबंद दरपत्रके मागविण्याबाबतची संपूर्ण माहिती, अटी व शर्ती न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे.

अटी व शर्ती –

१. सिलबंद लखोटयावर ठळक अक्षरात दरपत्रकाचा विषय स्पष्टपणे नमूद करावा. दरपत्रके दोन लिफाफ्यात सादर करावीत. एका लिफाफ्यात (Technical Bid) यामध्ये कंपनीची माहिती, कंपनी नोंदणी प्रमाणपत्र/ट्रेडींग लायसन्स/उद्यम प्रमाणपत्र/ गुमास्ता प्रमाणपत्र, मोबाईल क्रमांक, कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र, जीएसटी प्रमाणपत्राची प्रत, वार्षिक उलाढाल, पॅन कार्डची प्रत इ खालील नमूद केल्याप्रमाणे, दुसऱ्या लिफाफ्यात (Financial Bid) मूल्य दरपत्रक याप्रमाणे दोन वेगवेगळया लखोटयामध्ये भरुन लाखेने सिलबंद करुन सदर लिफाफे दि. २३/०८/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत मंदिर प्रतिक्षालय इमारत तळमजला येथील आवक–जावक नोंदणी विभागामध्ये सादर करावी.

२. दरपत्रक भरतांना सर्व प्रकारचे कर मिळून एकत्रित एकूण रक्कम भरावी. दरपत्रक भरताना न्यासाने दिलेल्या दरपत्रकात भरून देणे आवश्यक व गरेजेचे आहे. न्यास दरपत्रकात दर भरून न दिल्यास सदर कंपनीस अपात्र ठरविण्यात येईल.

३. आपल्या क्षेत्रात करीत असलेल्या कामाचा ३ वर्षाचा अनुभव असल्याबाबतची प्रमाणपत्रे तांत्रिक लिफाफ्यात सादर करावी. आपण करीत असलेल्या कामाचा दर्जा उत्तम प्रकारचा असावा.

४. मागील ३ वर्षाची आर्थिक उलाढाल कमीत कमी ५ लक्ष असावी. याबाबत सनदी लेखापाल (सीए) यांचे प्रमाणपत्र आवश्यक.

५. दरपत्रकधारकाचे कार्यालय न्यास कार्यालयापासून २०–२५ किमी अंतरावर असणे आवश्यक आहे. जेणेकरुन न्यासास त्वरीत सेवा उपलब्ध करुन देणे शक्य होईल.

६. आपणास दिलेल्या वेळेनुसार काम पूर्ण न केल्यास संबंधितांवर नियमांप्रमाणे कडक कार्यवाही करण्यात येईल.

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई
S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
☎ : 022-62491111 / 62491112
(Controlled by Govt. Of Maharashtra)
www. siddhivinayak.org
email :admin@siddhivinayak.org
info@siddhivinayak.org

७. काम सुरू करण्यापूर्वी कोणतेही आगाऊ प्रदान केले जाणार नाही. न्यासाच्या परवानीशिवाय कोणतेही अतिरिक्त काम करण्यात आल्यास केलेल्या कामाचा जादा मोबदला आपणास देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. काम पूर्ण केल्यानंतर न्यासास बिल सादर करताना बिलासोबत पॅनकार्ड/जीएसटी क्रमांकाचा तपशील व कंपनीच्या बॅकेचा तपशील (बॅकेचे नांव, खाते क्र., आयएफएसी कोड ) जोडावा.

८. माहितीची आवश्यकता असल्यास श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई कार्यालयात दूरध्वनी क्र. ०२२–६२४९११११ वर न्यासाचे देखभाल व दुरुस्ती विभागामधील विभाग प्रमुख यांच्याशी संपर्क साधावा.

९.नियमानुसार आवश्यक आयकर रक्कमेची कपात करणेत येईल. तसेच सर्व प्रकारचे कर अदा करणेची जबाबदारी दरपत्रकधारक यांची राहील.

१०.दरपत्रकधारकाने GST क्रमांक व PAN कार्ड दरपत्रकांत नमूद करावा व दरपत्रकासोबत जोडावा.

११.दरपत्रकधारकाने GST क्रमांक लागू नसल्यास, कंपनी लेटरहेडवर तसे नमूद करून न्यास दरपत्रकासोबत सादर करावे.

१२.दि.२३/०८/२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता दरपत्रके उघडण्यात येतील. दरपत्रके उघडताना दरपत्रकधारकाने सदर दिवशी उपस्थित रहाणे आवश्यक आहे. दरपत्रकधारक दरपत्रके उघडताना उपस्थित न राहिल्यास दरपत्रक उघडल्यानंतर आपले कोणतेही म्हणणे मान्य केले जाणार नाही. दरपत्रके उघडल्यानंतर दरपत्रकामध्ये कोणतेही बदल करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

Vpatil
कार्यकारी अधिकारी

# श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
☎ : 022-62491111 / 62491112

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www. siddhivinayak.org
email :admin@siddhivinayak.org
info@siddhivinayak.org


## दरपत्रकाचा तपशील

विषय : भाद्रपद गणेशोत्सव कालावधीत गणेश विसर्जनाकरीता न्यासामार्फत विविध मंडळांतर्फे ठेवण्यात येणाऱ्या जलजीवरक्षकांना टी–शर्ट खरेदी करून देण्याकरीता सिलबंद दरपत्रके मागविण्यासाठी.

नाव:————————————————————————————

पत्ता:————————————————————————————

————————————————————————————

कंपनी नोंदणी क्रमांक : ........................................ जीएसटी क्रमांक : ..........................................

पॅन कार्ड क्रमांक : ..............................................

| अ.क्र. | तपशील | दर (सर्व करांसहित) |
|---|---|---|
| १ | न्यासाने तयार करून दिलेल्या तपशीलाप्रमाणे (श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास – जलजीवरक्षक या नावाचे – १८०० टीशर्ट श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी या नावाचे – १२००)<br><br>विविध साईज प्रकार– M – 200qty, L- 900qty, XL- 900qty, XXL – 900qty, XXXL- 100qty<br><br>कापडाचा प्रकार (With collar)<br><br>कापड, प्रिंटीग व मजूरीसहित टीशर्टची एकूण संख्या ३००० | |
| | एकुण रक्कम (सर्व करांसहित) | |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का